डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र.बार्टी/योजना विभाग/जेईई व नीट /2025-2026/7593 दिनांक. 14/11/2025

# घोषणापत्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील (मातंग व इतर तत्सम मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारुडी, मादगी व मादिगा या जाती वगळून) उमेदवारांना बार्टी मार्फत सन 2025-27 या वर्षाकरीता मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, लातूर, अमरावती व छत्रपती संभाजीनगर ठिकाणासाठी जेईई करिता प्रत्येकी 75 विद्यार्थी व नीट करिता 75 विभागनिहाय असे एकूण 1050 विद्यार्थ्यास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने दि.25/06/2025 रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्राप्त ऑनलाईन माहितीच्या आधारे बार्टी मार्फत JEE व NEET करिता तात्पुरती निवड व प्रतीक्षा यादी दिनांक 04/09/2025 रोजी बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. प्रसिद्ध करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड व प्रतीक्षा यादीतील पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, नागपूर व अमरावती या 7 विभागातील निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुळ कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेण्यासाठी प्रशिक्षण केंद्र निवडीकरीता ऑनलाईन पोर्टल च्या माध्यमातून पसंतीक्रम नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तथापि **तांत्रिक कारणास्तव विद्यार्थ्याकडून पुन्हा एकदा ऑफलाईन पद्धतीने** प्रशिक्षण केंद्र विकल्प मागविण्यात येणार आहेत. याकरिता विद्यार्थ्यांनी **रविवार दिनांक 16 नोव्हेंबर 2025 व सोमवार दिनांक 17 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 10.00 ते सायंकाळी 6.00 पर्यंत** खाली दिलेल्या पत्यावर उपस्थित राहावे.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचे ठिकाण | पत्ता |
|---|---|---|
| 1. | पुणे व मुंबई | बार्टी येरवडा संकुल, कॉमरझोन आयटी पार्क, अंतर्गत रोड, जेल रोड, येरवडा, पुणे, महाराष्ट्र ४११००६ संपर्क क्र. ९५५२५२६२८८ |
| 2. | नागपूर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, अंबाजरी रोड, वसंतनगर नागपूर 440020 संपर्क क्र.9096687915 |
| 3 | नाशिक | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले समता प्रशिक्षण केंद्र, बार्टी कार्यालय, नाशिक |

| | | |
|---|---|---|
| | | समाज कल्याण विभाग, नासर्डी पूल, नाशिक पुणे हायवे नाशिक संपर्क क्र.9579615780 |
| 4 | अमरावती | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मालटेकडी, अमरावती 444606 संपर्क क्र. 7249418880 |
| 5 | लातूर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, राजे शिवाजी, मोती नगर लातूर 413512 संपर्क क्र.7767897969 |
| 6 | छत्रपती संभाजीनगर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवाजी हायस्कूलजवळ खोकडा पुरा छत्रपती संभाजीनगर 431 001 संपर्क क्र.9970660667 |

उपरोक्त पणे दिलेल्या पत्यावर विद्यार्थ्यांनी दिनांक 16 नोव्हेंबर 2025 व दिनांक 17 नोव्हेंबर 2025 रोजी हजर राहणे बंधनकारक आहे. ऑफलाईन पद्धतीने निवडलेल्या प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रशिक्षण सुरु करण्यात येणार असल्याने उपस्थिती बंधनकारक असेल. कोणत्याही स्वरूपात प्रशिक्षण केंद्र व प्रशिक्षणाचे ठिकाण बदलून मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी..

(सुनील वारे)

**महासंचालक**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे.**